Justdial®
India's No. 1 local search engine

August 9, 2025

To

| | | |
|---|---|---|
| **BSE Limited**<br>Phiroze Jeejeebhoy Towers,<br>Dalal Street,<br>Mumbai - 400 001<br>*Scrip Code: 535648* | **National Stock Exchange of India Limited**<br>Exchange Plaza, C-1,<br>Block G, Bandra-Kurla Complex,<br>Bandra (East), Mumbai – 400 051<br>*Trading Symbol: JUSTDIAL* | **Metropolitan Stock Exchange of India Limited**<br>Building A, Unit 205A, 2nd Floor,<br>Piramal Agastya Corporate Park,<br>L.B.S Road, Kurla (West),<br>Mumbai - 400 070<br>*Trading Symbol: JUSTDIAL* |

Dear Sir / Madam,

**Sub: Newspaper Clippings – "Annual General Meeting" of the Members of the Company and other related information**

The newspaper clippings of the advertisement on the captioned subject published today i.e. August 9, 2025 in the newspapers viz. "Financial Express" (English) and "Loksatta" (Marathi) are enclosed for information and records.

Thanking you,

Yours truly,

**For Just Dial Limited**

MANAN YOGENDRA UDANI

Digitally signed by MANAN YOGENDRA UDANI
Date: 2025.08.09 14:42:45 +05'30'

**Manan Udani**
**Company Secretary and Compliance Officer**
**Encl: As above**

# ‘लिथियम’च्या कमतरतेमुळे स्मृतिभ्रंश

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** लिथियमच्या (स्नायूंमधील स्थायूरूप मूलद्रव्य) कमतरतेमुळे स्मृतिभ्रंश होऊ शकतो, असे एका अभ्यासातून दिसून आले आहे. उंदरांवरील आणि मानवी ऊतींच्या नमुन्यांमधील अभ्यासात असे आढळून आले आहे की, लिथियम हे मेंदूच्या सामान्य कार्यासाठी आवश्यक आहे आणि या धातूचे नुकसान स्मृतिभ्रंश या रोगाच्या विकासास कारणीभूत ठरू शकते, असे संशोधकांनी म्हटले आहे.

या अभ्यासात असे दिसून आले आहे की, पिण्याच्या पाण्यासह वातावरणात लिथियम काही प्रमाणात लोह आणि व्हिटॅमिन सीसारखे पोषक तत्त्व म्हणून काम करू शकते आणि स्मृतिभ्रंशाचा धोका कमी करण्यास मदत करू शकते. लोह, जस्त आणि तांबे यांसारखे ‘ट्रेस मेटल’ हे धातू मेंदूच्या निरोगी कार्यासाठी महत्त्वाचे असल्याचे ज्ञात आहे.

हार्वर्ड मेडिकल स्कूल आणि अमेरिकेतील इतर संस्थांमधील संशोधकांनी सांगितले की, मेंदूमध्ये लिथियमची नैसर्गिक उपस्थिती आणि मेंदूच्या सर्व प्रमुख पेशींच्या सामान्य कार्याचे रक्षण करण्यात त्याची भूमिका दर्शविणारा हा पहिला अभ्यास आहे, ज्यामुळे वृद्धत्वाशी संबंधित ‘न्यूरोडीजनरेशन’पासून (मज्जासंस्थेतील पेशींचे हळूहळू होणारे नुकसान) अवयवाचे संरक्षण होते.स्मृतिभ्रंश रोग हा एक ‘न्यूरोडीजनरेटिव्ह डिसऑर्डर’ आहे, ज्यामध्ये स्मृती, विचार प्रक्रिया आणि निर्णय घेण्याची क्षमता यासारख्या संज्ञानात्मक कार्यांमध्ये वयानुसार घट होते आणि अखेरीस दैनंदिन क्रियाकलापांमध्ये व्यत्यय येऊ शकतो.

हा स्मृतिभ्रंश सर्वात सामान्य प्रकार आहे.अभ्यासकांच्या या पथकाने उंदरांवर प्रयोग केले आणि संज्ञानात्मक आरोग्याच्या विविध टप्प्यांत असलेल्या लोकांकडून घेतलेल्या मानवी मेंदूच्या ऊतींचे आणि रक्ताचे नमुने यांचेदेखील विश्लेषण केले.

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बँक
गोल्ड लोन
@8.30%*
शून्य प्रक्रिया शुल्क
मिस्ड कॉल द्या 8010 614 614
अर्जासाठी स्कॅन करा

Dr. Rucha's Tanvi Herbals Clinic
डॉ. रुचाज् तन्वी हर्बल्स क्लिनिक आणि नवतेज पंचकर्म सेंटर
ACIDITY महाकॅम्प
FREE हेल्थ चेकअप
तज्ज्ञ डॉक्टरांकडून योग्य मार्गदर्शन.
आजच नाव नोंदवा
ठाणे : 9082911530
तन्वी संचालिका
डॉ. रुचा मेहेंदळे - पै
By appointment only
आयुर्वेदिक एक्स्पर्ट
डॉ. आकांशा
स. 11 ते 1
डॉ. प्राची
सायं.4 ते 6

# शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचे बेमुदत आंदोलन

## राज्यभरात कामकाजावर परिणाम

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या मागण्यांना राज्य शासनाने सकारात्मक प्रतिसाद न दिल्याने अधिकाऱ्यांनी शुक्रवारपासून (८ ऑगस्ट) बेमुदत सामूहिक रजा आंदोलन पुण्यात सुरू केले. शिक्षण विभागातील गटशिक्षणाधिकाऱ्यांपासून संचालकांपर्यंतचे अधिकारी पहिल्यांदाच अधिकारी आंदोलनासाठी रस्त्यावर उतरले असून, या आंदोलनाचा शिक्षण विभागाच्या राज्यभरातील कामकाजावर परिणाम झाला.

नागपूर विभागातील बोगस शालार्थ आयडीचे प्रकरणात शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचे अटकसत्र सुरू आहे. भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३, भारतीय न्याय संहिता २०२३ या कायद्यांतर्गत शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना संरक्षण मिळावे, प्रशासकीय कामातील त्रुटी, अनियमिततेसाठी शालेय शिक्षण विभागाच्या परवानगीशिवाय विनाचौकशी कोणत्याही अधिकाऱ्यास पोलिसांनी परस्पर अटक करू नये. याबाबत शालेय शिक्षण विभागाने परिपत्रक प्रसिद्ध करावे, आदी संघटनेच्या मागण्या आहेत.

पुण्यातील मध्यवर्ती इमारतीसमोर अधिकाऱ्यांचे आंदोलन सुरू झाले. विशेष म्हणजे, मध्यवर्ती इमारतीतच शिक्षण आयुक्तालय, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय आहे. या आंदोलनात विस्तार अधिकारी ते संचालक पदापर्यंतच्या अधिकाऱ्यांचा सहभाग आहे. शिक्षक संघटनांसह वेगवेगळ्या संघटनांनीही या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे.



### अधिकाऱ्यांचा पहिल्यांदाच आंदोलनाचा पवित्रा

शिक्षण विभागातील शैक्षणिक गुणवत्तेसह विविध कामे अधिकारी करतात. अपुरे मनुष्यबळ, अपुऱ्या भौतिक सुविधा अशा परिस्थितीतही ताणतणाव सहन करत शासकीय कामकाज पूर्ण करतात. मात्र, शासनाने आमच्यासोबत राहावे, आम्हाला संरक्षण मिळावे या मागणीसाठी ‘एक है तो सेफ है’ म्हणून अधिकाऱ्यांनी एकत्र येऊन आंदोलन सुरू केले आहे. पहिल्यांदाच अधिकाऱ्यांचे असे आंदोलन होत आहे. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्यात येणार असल्याची भूमिका संघटनेने मांडली.

नागपूर येथील प्रकरणासंदर्भात एसआयटी स्थापन झाली आहे. विभागातील अधिकाऱ्यांच्या आंदोलनाबाबत शासनाला माहिती देण्यात आली आहे.
**– सचिंद्र प्रताप सिंह,** शिक्षण आयुक्त

### बैठक रद्द

शिक्षण विभागाशी संबंधित विविध विषयांचा आढावा घेण्यासाठी शुक्रवारी राज्य मंडळात प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र, अधिकाऱ्यांच्या आंदोलनामुळे ही बैठक रद्द करण्यात आली.

# दादर-रत्नागिरी रेल्वेगाडीसाठी प्रवासी एकवटले

## १५ ऑगस्टपासून उपोषणाचा इशारा

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** गेल्या पाच वर्षांपासून दादर-रत्नागिरी रेल्वेगाडीची सेवा बंद आहे. दादरवरून थेट रत्नागिरीला जाण्यासाठी या रेल्वेगाडीचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात होता. परंतु, मध्य रेल्वेने विविध कारणांसाठी दादर-रत्नागिरीची सेवा बंद केली. त्यामुळे दादर-रत्नागिरी रेल्वेगाडी त्वरित सुरू करण्यासाठी प्रवासी एकवटले आहेत. ही रेल्वेगाडी सुरू होण्यासाठी १५ ऑगस्ट रोजीपासून लाक्षणिक उपोषण करण्याचा इशारा रेल्वे प्रवाशांनी दिला आहे.

१९९६/९७ पासून गाडी क्रमांक ५०१०३/५०१०४ रत्नागिरी-लोकमान्य टिळक टर्मिनस पॅसेंजर गाडी सुरू झाली. नंतर लोकाग्रहास्तव ती रत्नागिरी-दादर मार्गावर धावू लागली. सर्वच स्थानकांवर थांबत असल्यामुळे ती सर्वात लोकप्रिय ठरली व सर्वांच्या जीवनाचा एक भाग झाली. कोकणातील रत्नागिरी व रायगड जिल्ह्यांतील सर्वच लहान - मोठ्या गावांतून सकाळी लवकर निघून मुंबई शहरात पोहोचून दुपारपर्यंत आपली कामे आटोपून त्याच दिवशी गावी परत जाण्यासाठी सर्वांनाच या गाडीचा मोठा आधार होता.

करोनाकाळात दादर - रत्नागिरी रेल्वेगाडी बंद केली. त्यानंतर २०२० सालच्या शून्य आधारित वेळापत्रकात वक्तशीरपणा सुधारण्यासाठी मध्य रेल्वेने ही गाडी दिव्यापर्यंतच चालवण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सप्टेंबर २०२१ पासून ही गाडी दिव्यापर्यंत धावते. दुसरीकडे, गेल्या १० वर्षांपासून मुंबईतून थेट चिपळूणला जाणारी दैनंदिन रेल्वेगाडी सुरू करण्याच्या मागणीची पूर्तता झालेली नाही.

दादर-रत्नागिरी रेल्वेगाडी सुरू करण्यासाठी रेल्वे प्रशासन, लोकप्रतिनिधींकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. परंतु, अद्याप या मागणीची पूर्तता झालेली नाही. रेल्वे प्रशासन उत्तर भारतातील रेल्वेगाड्या चालवण्यात व्यस्त आहे. मात्र राज्यातील प्रवाशांना सोयी-सुविधा उपलब्ध करण्याकडे दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे आता लाक्षणिक उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
**– अक्षय महापदी,** सचिव, अखंड कोकण रेल्वे प्रवासी सेवा समिती

### उत्तर भारतातील रेल्वेगाड्यांना प्राधान्य

प्रवाशांकडून दादर-रत्नागिरी रेल्वेगाडीला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. असे असतानाही ही रेल्वेगाडी सुरू करण्यात येत नाही. याउलट दादर-गोरखपूर, दादर-बलिया रेल्वेगाडी चालवून परप्रांतीयांसाठी रेल्वे प्रवासासाठी पर्याय उपलब्ध करण्यात येत आहेत, असा आरोप प्रवाशांनी केला आहे.

# पडळकर समर्थकाचे अपहरण

## रोहित पवार यांच्या कार्यकर्त्याविरुद्ध गुन्हा

लोकसत्ता प्रतिनिधी

**सोलापूर :** तीन वर्षांपूर्वी सोलापुरात आमदार गोपीचंद पडळकर यांच्या मोटारीवर दगड फेकल्याचा राग मनात धरून मारहाण करणाऱ्या पडळकर समर्थक कार्यकर्त्याचे चार तरुणांनी एका गाडीतून अपहरण करून त्याच्या पायावर कोयत्याने वार केल्याचे प्रकरण सोलापुरात घडले. अपहृत समर्थकाच्या अपहरणाचा पोलिसांनी चार तासांत छडा लावून त्याची कर्नाटकातील झळकाली येथून सुटका केली.

दरम्यान, तरुणाच्या पायावर कोयत्याने वार झाले आहेत. त्यास वैद्यकीय उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची माहिती पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली. घटनेची माहिती कळताच आमदार गोपीचंद पडळकर यांनी रुग्णाची भेट घेतली.

याप्रकरणी चौघांना अटक केली असून त्यांना शुक्रवारी न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले असता चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. याप्रकरणावरून आमदार गोपीचंद पडळकर यांनी आमदार रोहित पवार यांच्यावर संताप व्यक्त करत त्यांना मुख्य सूत्रधार म्हणून आरोपी करावे, अशी मागणी केली आहे.



### रोहित पवार हे मुख्य सूत्रधार - पडळकर

अपहरणकर्त्यांपैकी एक जण आमदार रोहित पवार यांचा कार्यकर्ता आहे. २०२१ साली आपण सोलापुरात आलो असता आपल्या गाडीवर दगड मारणारा हा तोच कार्यकर्ता होता. त्यावेळी आपल्या समर्थक असलेल्या कार्यकर्त्याने त्यास मारहाण केली होती. म्हणून त्याने चिडून त्याचे अपहरण केले आणि त्याचा खून करण्याचा डाव होता, असा आरोप पडळकर यांनी केला. या प्रकरणी आमदार रोहित पवार यांना मुख्य सूत्रधार म्हणून आरोपी करावे, अशी मागणीही त्यांनी केली. रुग्णालयात संबंधित रुग्णाची भेट घेऊन माहिती घेतली असता, त्याने सांगितले की मला गाडीत बसविल्यानंतर एक ‘व्हिडिओ कॉल’ आला आणि त्यावर आपण माफी मागितली. परंतु तो ‘व्हिडिओ कॉल’ रोहित पवार यांचा होता, असे त्याने सांगितल्याचे पडळकर यांनी स्पष्ट केले.



### ‘सरकार तुमचेच, एसआयटी चौकशी करा’

समोरचा कार्यकर्ता कोण आहे, हेच मला माहिती नाही. मला कुठल्याही विषयावर अडकवण्याचा प्रयत्न होत असेल तर मी कोणालाही घाबरणार नाही, अशा शब्दात आमदार रोहित पवार यांनी पडळकर यांना प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, सरकार तुमचे आहे. त्यामुळे तुम्ही वाटल्यास ‘एसआयटी’ची स्थापना करा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे चौकशी करा, मी दररोज सरकारमधील एका एका मंत्र्याला अडचणीत आणतोय. म्हणूनच मला कोणत्याही प्रकारे अडकवण्याचा प्रयत्न करणार असाल तर आम्ही काही दूधखुळे नाही. अपहरण करणारा कार्यकर्त्यांस ओळखतो, हे नाकारत नसल्याचेही रोहित पवार यांनी स्पष्ट केले.

# सोलापूर जिल्ह्यात लम्पीची साथ

## ५७ जनावरे मृत्युमुखी; ४४१ बाधित

लोकसत्ता प्रतिनिधी

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यात गोवंशीय जनावरे अर्थात गुरांमध्ये लम्पी हा साथीचा आजार फैलावत आहे. त्याने आतापर्यंत ५७ जनावरे दगावली आहेत, तर ४४१ जनावरांना लम्पी आजाराचा विळखा पडला आहे. त्याबाबतची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

लम्पी आजाराची साथ त्वचेशी संबंधित असते. सर्वाधिक फैलाव माळशिरस तालुक्यात असून, तेथे एकूण ७१० जनावरांना या आजाराची लागण झाली होती. त्यांपैकी सध्या ५८७ जनावरे आजारमुक्त झाली मात्र, १३ जनावरे दगावली असून, ११० जनावरे आजारी आहेत.

दरयान, सर्व पशुपालकांनी जनावरांचे लसीकरण करून घ्यावे असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले आहे.

**Sangli, Miraj and Kupwad City Municipal Corporation(SMKMC),**
**Sangli, Government of Maharashtra**
**Sangli, Miraj and Kupwad Municipal Corporation**
**Opposite City Police Station, Rajwada Chowk, Sangli, Maharashtra Pin Code 416416**
**TENDER NOTICE IN-SMKMC-493093-CW-RFB**

Municipal Commissioner, Sangli, Miraj & Kupwad Municipal Corporation (SMKMC), Sangli, Government of Maharashtra, Sangli, Miraj And Kupwad Municipal Corporation, Opposite City Police Station, Rajwada Chowk, Sangli, Maharashtra, Pin Code 416 416 invites bids from eligible bidders for Construction and implementation of storm water works for Urban Flood Mitigation in Sangli, Miraj & Kupwad Municipal Corporation (SMKMC) under Maharashtra Resilience Development Project (MRDP)

| Name of Work | Tender Notice No. | Tender Fee |
|---|---|---|
| Construction and implementation of storm water works for Urban Flood Mitigation in Sangli, Miraj & Kupwad Municipal Corporation (SMKMC) | IN-SMKMC-493093-CW-RFB | Rs. 15,000/- |

BID documents can be downloaded online from 07th August 2025. For detailed tender notice and to download BID document please visit website https://mahatenders.gov.in
The last date for submitting of BID form duly filled is 23rd September 2025 till 17.00 HRS.(IST)
Sd/-
**Commissioner**
Sangli, Miraj & Kupwad City Municipal Corporation (SMKMC)

# नांदगावजवळ मालगाडी घसरली

## भुसावळ-मुंबई रेल्वे वाहतूक विस्कळीत

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नाशिक :** नांदगाव रेल्वे स्थानकाजवळ शुक्रवारी सकाळी मालगाडीचा डबा घसरल्याने मध्य रेल्वेच्या भुसावळ-मुंबई मार्गावरील रेल्वे वाहतूक अडीच ते तीन तास विस्कळीत झाली. राजधानी, सचखंड, दुरांतो, वाराणसी-एलटीटी एक्स्प्रेससह अनेक लांब पल्ल्याच्या गाड्यांचा त्यामुळे खोळंबा झाला. युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम झाल्यानंतर मुंबईकडे जाणारी रेल्वे वाहतूक सुरळीत झाली.



सकाळी सव्वा सात वाजता नांदगाव रेल्वे स्थानकाजवळ दौंडकडे निघालेल्या मालगाडीचा रिकामा डबा रुळावरून घसरला. यामुळे दिल्ली-मुंबई राजधानी एक्स्प्रेस, अमृतसर-नांदेड सचखंड एक्स्प्रेस, धुळे - मुंबई एक्स्प्रेस, हावडा-मुंबई दुरांतो एक्स्प्रेस, पाटणा-एलटीटी पाटलीपुत्र एक्स्प्रेस आदी गाड्या वेगवेगळ्या स्थानकांवर थांबवून ठेवण्यात आल्या होत्या.

# भारतातील वनक्षेत्राचे मोठे नुकसान

## प्रति चौरस किलोमीटरमागे १८ चौरस किलोमीटर जंगल नष्ट

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नागपूर :** २०१५ ते २०१९ या कालावधीत भारतातील वनक्षेत्राचे मोठे नुकसान झाले. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई आणि एसएसटीआरए डीम्ड युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी केलेल्या अभ्यासातून ही बाब समोर आली आहे. या चार वर्षांच्या कालावधीत वाढलेल्या प्रत्येक एक चौरस किलोमीटरमागे देशाने सुमारे १८ चौरस किलोमीटर जंगल गमावले.

देशभरातील संरचनात्मक जोडणी समजून घेण्यासाठी आणि वनविच्छेदनाचे निरीक्षण करण्यासाठी कोणतीही प्रमाणित पद्धत अस्तित्वात नाही, असेही या अभ्यासात म्हटले आहे.

२०१५ ते २०१९ पर्यंत भारतातील सर्व राज्यांनी वनक्षेत्राचे निव्वळ नुकसान अनुभवले. ५६.३ चौरस किलोमीटरच्या एकूण वनक्षेत्रापैकी जवळजवळ निम्मी वाढ आंध्र प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक आणि राजस्थानमध्ये झाली. तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये एकत्रितपणे १,०३२.८९ चौरस किलोमीटर एकूण वनक्षेत्रापैकी जवळजवळ निम्मी झाली, असेही या अहवालात म्हटले आहे. या अभ्यासातील निष्कर्ष अलीकडच्या ‘भारतीय वन सर्वेक्षण’शी अगदी विसंगत आहेत.

दरम्यान, नवीन जोडण्यात आलेली बहुतेक जंगले बेटे, अत्यंत विखुरलेली आणि पर्यावरणीयदृष्ट्या असुरक्षित होती, जी मोठ्या वनक्षेत्रांना जोडण्यात फारशी मदत करत नाहीत, असे एसएसटीआरए डीम्ड युनिव्हर्सिटीचे सहलेखक प्रा. वासू सत्यकुमार यांनी या अहवालात म्हटले आहे.

Justdial®
**जस्ट डायल लिमिटेड**
**CIN: L74140MH1993PLC150054**
**नोंदणीकृत कार्यालय:** पाम कोर्ट, बिल्डिंग-एम, ५०१/बी, ५वा मजला, न्यू लिंक रोड, गोरेगाव स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या शेजारी, मालाड (पश्चिम), मुंबई - ४०० ०६४.
दूरध्वनी: +९१ २२ २८८८ ४०६०
वेबसाईट: www.justdial.com; ई-मेल: investors@justdial.com

**एकतिसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची माहिती**

कंपनी कायदा, २०१३ आणि त्या अंतर्गत बनविण्यात आलेले नियम व सिक्युरिटीज अँण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स् अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) नियम, २०१५, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय (**‘‘एमसीए’’**) आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (**‘‘सेबी’’**) द्वारा जारी करण्यात आलेल्या लागू परिपत्रकांसोबत वाचले असता, एजीएम बोलाविणाऱ्या सूचनेत नमूद करण्यात आलेले कामकाज करण्यासाठी कंपनीच्या सदस्यांची एकतिसावी वार्षिक सर्वसाधारण सभा (**‘‘एजीएम’’**) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (**‘‘व्हीसी’’**)/इतर ऑडिओव्हिज्युअल माध्यमांद्वारे (**‘‘ओएव्हीएम’’**) द्वारे **मंगळवार, दिनांक २ सप्टेंबर, २०२५ रोजी भाप्रवेळ सायंकाळी ५.३० वाजता** होईल.

कंपनी/केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड (**‘‘केफिनटेक’’**) कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट /डिपॉझिटरी सहभागी/डिपॉझिटरीज, यांच्याकडे ज्यांचे ई-मेलचे पत्ते नोंदविण्यात आले आहेत अशा कंपनीच्या सदस्यांना, एजीएमची सूचना आणि वित्तीय वर्ष २०२४-२५ चे लेखापरिक्षित वित्तीय विवरण, त्याचप्रमाणे संचालक मंडळाचा अहवाल, लेखापरीक्षकांचा अहवाल आणि त्यासोबत जोडण्याचे इतर दस्तऐवज, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात येतील. कंपनी/केफिनटेक/डिपॉझिटरी सहभागी/डिपॉझिटरीज यांचेकडे ज्यांचे ई-मेलचे पत्ते नोंदविण्यात आलेले नाहीत अशा सदस्यांना, आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या वार्षिक अहवाल उपलब्ध असलेल्या अचूक पाथसह वेब-लिंक देणारे पत्र पाठविण्यात येईल. एजीएमजी सूचना आणि वर नमूद करण्यात आलेले दस्तऐवज कंपनीच्या वेबसाईटवर **www.justdial.com**, येथे आणि स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईटसवर म्हणजे बीएसई लिमिटेड, **www.bseindia.com** येथे आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड, **www.nseindia.com** येथे आणि मेट्रोपोलिटन स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडियाच्या वेबसाईटवर **www.msei.in** येथे आणि केफिनटेकच्या वेबसाईटवर **https://www.evoting.kfintech.com** येथे देखील उपलब्ध असतील.

**ई-मेल पत्ता नोंदविण्याची/त्यात सुधारणा करण्याची पद्धती:**

ज्यांनी त्यांच्या डिपॉझिटरी सहभागी यांचेकडे त्यांच्या ई-मेलच्या पत्याची नोंदणी/सुधारणा केलेली नाही अशा सदस्यांना त्यांचे डिमॅटचे खाते ज्यांच्याकडे आहे अशा डिपॉझिटरी सहभागींकडे त्याची नोंदणी/सुधारणा करण्याची विनंती करण्यात येत आहे.

**ई-मतदान पद्धतीने मतदान करण्याची प्रक्रिया:**

सदस्य एजीएमच्या सूचनेत नमूद केलेल्या ठरावांवर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेद्वारे (**‘‘ई-मतदान’’**) त्यांचे मतदान करू शकतील. ज्यांनी त्यांच्या ई-मेलचे पत्ते नोंदविलेले नाहीत अशा सदस्यांसाठी दूरस्थ पद्धतीने मतदान (**‘‘रिमोट ई-मतदान’’**) करण्यासह मतदानाच्या पद्धतीची माहिती एजीएमच्या सूचनेत देण्यात आली आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहणाऱ्या व ज्यांनी दूरस्थ ई-मतदान पद्धतीने मतदान केले नाही असे सदस्य एजीएमच्या ठिकाणी इन्स्टा पोल पद्धतीने मतदान करू शकतील.

**व्हीसी/ओएव्हीएम द्वारा एजीएममध्ये सहभागी होणे:**

**सदस्य जिओमिट द्वारा https://jioevents.jio.com/justdialagm येथे व्हीसी/ओएव्हीएम द्वारा एजीएमला उपस्थित राहू शकतील. येथे वापरण्याची लॉगइनची माहिती आणि एजीएमला उपस्थित राहण्याचे टप्पे यासंबंधी माहिती एजीएमच्या सूचनेत देण्यात आली आहे.**

**सदस्यांना एजीएमची सूचना काळजीपूर्वक वाचण्याची, खास करून, एजीएममध्ये सहभागी होणे आणि दूरस्थ ई-मतदान पद्धतीने मतदान करणे किंवा एजीएममध्ये मतदान करणे यासंबंधी सूचना वाचण्याची, विनंती करण्यात येत आहे.**

संचालक मंडळाच्या आदेशाने
स्वाक्षरी/-
**मनन उदाणी**
कंपनी सेक्रेटरी आणि कंप्लायन्स ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : ९ ऑगस्ट, २०२५

आपत्काले रक्षिष्यामि
GIC Re
**भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळ**

एकूण प्रीमियम - 30.06.2024 रोजीच्या ₹ 12,405.68 च्या तुलनेत ₹ 12,388.01 कोटी
सॉल्व्हेंसी रेशो - 30.06.2024 रोजी 3.36% वरून 3.85% वाढला.
एकत्रित गुणोत्तर - गेल्या वर्षीच्या याच तिमाहीच्या तुलनेत 106.94%, 2.66% ने कमी.
करपश्चात नफा - ₹ 1,752.23 कोटी गेल्या वर्षीच्या याच तिमाहीच्या तुलनेत 69% ने वाढला.

**30 जून 2025 रोजी संपलेल्या तिमाहीसाठी पुनरावलोकन केलेले आर्थिक निकाल**

रक्कम ₹ कोटींमध्ये

| अनु. क्र. | तपशील | स्टँडअलोन | | | कंसोलिडेटेड | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तिमाही संपली (तीन महिने) | वर्ष ते आजचे आकडे (तीन महिने) | मागील वर्षात संपलेल्या संबंधित 3 महिन्यांचे | तिमाही संपली (तीन महिने) | वर्ष ते आजचे आकडे (तीन महिने) | मागील वर्षात संपलेल्या संबंधित 3 महिन्यांचे |
| | | (30/06/2025) | (30/06/2025) | (30/06/2024) | (30/06/2025) | (30/06/2025) | (30/06/2024) |
| | | पुनरावलोकन केले | पुनरावलोकन केले | पुनरावलोकन केले | पुनरावलोकन केले | पुनरावलोकन केले | पुनरावलोकन केले |
| 1 | ऑपरेशन्समधून एकूण उत्पन्न $ | 12,388.01 | 12,388.01 | 12,405.68 | 12,417.16 | 12,417.16 | 12,589.42 |
| 2 | कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (करपूर्व, अपवादात्मक आणि/किंवा असाधारण बाबी#) | 2,243.54 | 2,243.54 | 1,393.16 | 2,663.67 | 2,663.67 | 1,490.13 |
| 3 | करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण वस्तूंनंतर#) | 2,243.54 | 2,243.54 | 1,393.16 | 2,663.67 | 2,663.67 | 1,490.13 |
| 4 | कर नंतरच्या कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण वस्तूंनंतर#) | 1,752.23 | 1,752.23 | 1,036.36 | 2,530.59 | 2,530.59 | 1,400.66 |
| 5 | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न [या कालावधीसाठी (करानंतर) नफा/(तोटा) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर) समाविष्ट आहे] | 1,752.23 | 1,752.23 | 1,036.36 | 2,530.59 | 2,530.59 | 1,400.66 |
| 6 | इक्विटी शेअर कॅपिटल | 877.20 | 877.20 | 877.20 | 877.20 | 877.20 | 877.20 |
| 7 | मागील वर्षाच्या ऑडिट केलेल्या ताळेबंदात दाखवल्याप्रमाणे राखीव निधी (पुनर्मूल्यांकन राखीव निधी वगळून). | 46,239.75 | 46,239.75 | 38,858.08 | 51,010.10 | 51,010.10 | 42,387.45 |
| 8 | प्रति शेअर कमाई (प्रत्येकी ₹ 5/-) (चालू आणि बंद केलेल्या ऑपरेशन्ससाठी) - | | | | | | |
| | 1. मूलभूत: | 9.99 | 9.99 | 5.91 | 14.42 | 14.42 | 7.98 |
| | 2. पातळ केलेले | 9.99 | 9.99 | 5.91 | 14.42 | 14.42 | 7.98 |

**नोंद**

अ. वरील माहिती सेबी (लिस्टिंग आणि इतर प्रकटीकरण आवश्यकता) नियमावली, २०१५ च्या नियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या तिमाही आणि वर्ष ते तारखेच्या आर्थिक निकालांच्या तपशीलवार स्वरूपाचा उतारा आहे. लेखापरीक्षकाच्या अहवालासह तिमाही आणि वर्ष ते तारखेच्या आर्थिक निकालांचे संपूर्ण स्वरूप स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइट्स (www.bseindia.com) आणि (www.nseindia.com) वर उपलब्ध आहे आणि कॉर्पोरेशनच्या वेबसाइटवर (https://www.gicre.in/images/2025/OutcomeofBoardMeetingQ12025 2026signed.pdf) पोस्ट केले आहे आणि QR कोड स्कॅन करून ते ॲक्सेस करता येते.

ब. $ऑपरेशन्समधून मिळणारे एकूण उत्पन्न हे एकूण लिखित प्रीमियम, पुनर्विम्याचे एकूण उत्पन्न आणि लागू करांचे निव्वळ आहे.

क. #भारतीय लेखा मानके (IND AS) सध्या भारतातील विमा कंपन्यांना लागू नाहीत.

**भारतीय जनरल इन्शुरन्स कॉर्पोरेशनच्या वतीने आणि**
**एसडी/-**
**रामास्वामी नारायणन**
**अध्यक्ष-सह-व्यवस्थापकीय संचालक**
**डीआयएन: 10337640**

**ठिकाण: मुंबई**
**दिनांक: 07.08.2025**

‘सुरक्षा’, 170, जमशेदजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई 400020, भारत
टेलिफोन (बोर्ड): +91 22 2286 7000 • ईमेल: info@gicre.in
आयआरडीएआय नोंदणी क्रमांक: 112 | सीआयएन: L67200MH1972GOI016133 | www.gicre.in